# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१९/०४/२०१९

## दि.१८/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे १७०/१९,भादविक ४०६,४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम,वय-३१,रा.ताडीवाला रोड,पुणे |
| **आरोपी** | एक इसम बँकेतील खातेधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/१२/२०१८ व दि.३०/०१/२०१९ रोजी आरटीओ कार्यालय,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची कार ही कारचे रोड टॅक्स व व्यवसाय कर न भरल्याने पकडुन आरटीओ कार्यालयात जमा केली होती. त्या दरम्यान फिर्यादी यांची यातील नमुद एजंट याचेशी ओळख झाली. त्यावेळी त्याने फिर्यादी यांचे कारचे रोड टॅक्स, व्यवसाय कर व दंडासह एकुण ५२ हजार रूपये होत आहे. तुम्ही हे सर्व पैसे भरल्यानंतर तुमची गाडी तुम्हाला परत मिळेल असे सांगुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,त्यांचेकडुन ५२ हजार रुपयेचा अपहार करून,तसेच कारचे इन्शुरन्ससह इतर मुळ कागदपत्रे घेवुन जावुन,फिर्यादी यांचा फोन न उचलता,त्यांना न भेटता फरार होऊन,फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. व्हि.डी.देशमुख ९४२१०८५८८८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे २९८/१९,भादविक ३०६,५०४,५०७ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४९ वर्षे,रा.चर्च रोड,पुणे स्टेशन जवळ,पुणे |
| **आरोपी** | अभय रामचंद्र कुलकर्णी,वय-४८,रा.गुरूराज सोसा.,पुणे-सातारा रोड,पद्मावती,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१६ ते दि.०१/०४/२०१९ रोजीचे दरम्यान ऑफिस स.नं.नं.३७/४,पार्वती हाईटस, श्रीनगर,धनकवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | सहकारनगर पो स्टे अ.मयत रजि.नं.३७/२०१९,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील फिर्यादी यांचे पती युवराज चंद्रसेन ननवरे,वय-५० वर्षे,रा.बी.जे.मेडीकल महिला वसतीगृह क्वॅार्टस,चर्च रोड,पुणे यांची यातील नमुद इसम अभय कुलकर्णी याचेबरोबर व्यवसायचे दृष्टीने ओळख झाली होती. त्यानंतर नमुद कालावधी मध्ये युवराज यांनी अभय याचेकडून वेळोवेळी अशी एकुण अंदाजे ६७ लाख रूपये व्याजाने घेतले होते. त्यापैकी युवराज ननवरे यांनी वेळोवेळी अभय कुलकर्णी यांना व्याजाचे एकुण ५६ लाख रूपये दिले होते. सदरची उर्वरीत रक्कम व रकमेवरील व्याज असे दोघांमध्ये ठरलेल्या व्यवहाराप्रमाणे युवराज हे देवु न शकल्या मुळे सदर इसमांनी समक्ष व फोनवरून कॉल करून युवराज यांना शिवीगाळ करून,त्यांचे मोबाईलवर संदेश पाठवुन मानसिक त्रास दिल्याने,त्याचे सततच्या मानसिक त्रासाला कंटाळुन युवराज ननवरे यांनी दि.०१/०४/२०१९ रोजी त्यांचे राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) व्हि.आर.पुराणिक ९८२३२२६१४५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**